भारती विदयापीठ पोलीस ठाणे
दिनांक-०६/०३/२०१९

# प्रेसनोट

## बँकेची फसवणूक करून नउ महीन्यापासून पाहीजे असलेला आरोपी अटकेत

भारती विदयापीठ पोलीसांची कामगिरी

दि.०५/०३/२०१९ रोजी तपास पथकाचे सहा.पो.उप-निरीक्षक प्रदीप गुरव हे त्यांचे स्टाफसह पोलीस ठाणे हददीत घडणारे गंभीर गुन्हयांना प्रतिबंध व्हावा म्हणुन पेट्रोलींग करीत असताना पेट्रोलींग करीत करीत कात्रज चौक येथे आलो असता **सहा.पो.उप-निरीक्षक प्रदीप गुरव** बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, एक इसम त्याचे निळे रंगाचा फुलबाहयांचा शर्ट व निळया रंगाची पॅन्ट तसेच डोळयावर चेष्मा घातलेले वर्णनाचा मोरे बाग बसस्टॉपवर थांबलेला असुन तो स्वारगेट पोलीस स्टेशनच्या फसवणुकीच्या गुन्हयात सुमारे ९ महीन्यापासुन निष्पन्न व पाहीजे आरोपी आहे. अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याचे आम्हांस कळविलेनंतर लागलीच आम्ही सदरची बातमी वरिष्ठांना कळविली असता त्यांनी खात्री करुन योग्य ती कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केलेनंतर लागलीच आम्ही कात्रज चौक येथुन स्टाफसह रवाना होवुन मोरेबाग बसस्टॉप जवळ जावुन वॉच केला असता बातमीतील वर्णनाचा इसम बसस्टॉप शेजारी संशयीत रित्या वावरत असताना दिसलेने त्यांस हटकले असता तो पळुन जाणेचा प्रयत्न करु लागल्याने त्यांस स्टाफचे मदतीने १७.००वा पकडुन त्यांस आहे त्या स्थितीत ठेवुन त्यांस त्याचा नाव पत्ता विचारता त्यांने त्याचा नाव पत्ता **विठठल अनंता घोरपडे वय.३७ वर्ष रा. बी/१०३ ओजेरो पॅरामाऊन्ट सोसायटी आंबेगाव कात्रज पुणे** असे असल्याचे सांगितले. नंतर त्यांस पोलीस ठाणे येथे आणून विश्वासात घेवुन त्यांचेकडे तपास केला असता तपासदरम्यान त्यांने गुन्हा केल्याची कबुली दिल्याने, त्याबाबत **स्वारगेट पोलीस ठाणे गु.र.नं २०७/२०१८ भादवि कलम ४२०, ४६७, ४६८ प्रमाणे** गुन्हा दाखल असल्याचे आढळुन आले आहे.

सदरचा आरोपी हा नउ महीन्यापासून मिळून येत नव्हता त्यास पुढील योग्य ती कारवाई करणेकामी स्वारगेट पोलिसांचे ताब्यात देण्यात आले आहे.

**सदरची कारवाई मा.श्री रविंद्र सेनगावकर सो अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम विभाग, मा.श्री बच्चन सिंह सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे शहर, मा.व्ही.पी.नांदेडकर सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, विष्णू पवार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे सहा.पो.उप-निरीक्षक प्रदीप गुरव, पोलीस हवालदार विनोद भंडलकर,गणेश सुतार,उज्वल मोकाशी,प्रणव सकपाळ,शिवदत्त गायकवाड,जगदीश खेडेकर यांचे पथकाने केलेली आहे.**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
भारती विदयापीठ पोलीस ठाणे-पुणे